**योजनेचे नांव :- 2515-1238 मा. लोकप्रतिनिधीनी सुचविलेली कामे.**

१) योजना कोणाची :- महाराष्ट्र शासन.

२) योजनेची संक्षिप्त माहिती :-

2515-1238 अंतर्गत मा.लोकप्रतिनिधीनी सुचविलेली ग्रामीण भगातील रस्ते गटारे व अन्य मुलभूत सुविधा पुरविणेत येत असतात. सदर योजने अंतर्गत कामाची निवड व रक्कम नमूद होऊन प्रशासकिय मान्यता आदेश शासन स्तरावरुन जिल्हा परिषदेस प्राप्त होत असतात.

योजनेचे निकष व अटी शर्ती

१. मा. लोकप्रतिनिधीनी शासन स्तरावर सुचविल्यानुसार ग्रामपंचायतीची /गावाची व कामाची निवड होऊन तसेच अनुदान नमुद होऊन आदेश प्राप्त होत असतात.
२. शासन स्तरावरुन निवड झालेल्या कामाकरिता ग्राम पंचायत मालकीच्या जागेची आवश्यक्ता असते.
३. निवडलेले काम रस्ता असेल तर त्याची नांेद असलेला ग्रा.प.नमुना नं.26 चा उतारा
४. समजुतीचा नकाशा

३) योजनेचे फायदे

- ग्रामपंचायत क्षेत्राचा विकास होतो. तसेच गावामध्ये रस्ते तसेच गटर झालेने राहणीमानाचा दर्जा सुधारला जातो.
- शासनाच्या योजना सर्व सामान्यापर्यत पोहोचण्यासाठी मदत होते.
- ग्रामपंचायतीचा आर्थीक, सामाजिक,सांस्कृतीक, औद्योगिक , कृषी औद्योगिक आणि वाणिज्यिक विकास होण्यासाठी व प्राधान्याने तेथील राहणीमान दर्जेदार होण्यासाठी शहराच्या तोडीच्या मुलभूत सुविधा व रोजगार संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.